# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला
ई-मेल: directorcrs78@gmail.com


जा.क्र.मसंकें/सामान्य/२०४१/२०२५ दि. १० /०२ /२०२५

### निविदा/कोटेशन सूचना

**विषय:- मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत विविध विभागावरील जुने वापरात नसलेले ठिबक सिंचनाचे नळ्या विक्रीकरिता निविदा दर मागविणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत विविध विभागावरील जुने वापरात नसलेले ठिबक सिंचनाचे नळ्या विक्रीकरिता दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा/कोटेशन मसुदा सोबत जोडलेला आहे.

**अटी व शर्ती**

१. विक्रीचा तपशील सलग्न केलेल्या कोटेशन/निविदा मसुदा मधे दिलेला आहे.

२. मसुदामधे नमूद तपशिलानुसार कोटेशन सादर केल्यास कोटेशन विचारात घेण्यात येईल.

३. कोटेशन/निविदा संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी व लिफाफ्यावर **"ठिबक सिंचनाचे नळ्या विक्रीकरिता"** नमूद केलेले असावे.

४. कोटेशन/निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील.

५. कोटेशन/निविदा मधे दर्शविण्यात आलेले दर हे सहा महिन्याकरिता वैध राहतील.

६. कोटेशन/निविदा उघडल्या नंतर जास्तीत जास्त दर नमूद केलेल्या निविदाधारकास नळ्या विक्री करण्यात येतील.

७. जास्तीत जास्त दर नमूद केलेल्या निविदाधारकास कळविण्यात आलेल्या दिनांकापासून १० दिवसाचे आत दिलेल्या तपशिलानुसार साहित्याची उचल करण्यात यावी.

८. मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत विविध विभागावरुन तपशिलानुसार साहित्याची उचल करण्याची जबाबदारी जास्तीत जास्त दर नमूद केलेल्या निविदाधारकाची राहील.

९. तपशिलानुसार साहित्याची उचल करतांना जास्तीत जास्त दर नमूद केलेल्या निविदाधारकाने वजन काटा करून देय असलेली रक्कम त्याचवेळी संबंधित विभागास अदा करणे बंधनकारक राहील. देय रक्कम अदा करण्याकरिता अतिरिक्त वेळ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. तपशिलानुसार साहित्याची उचल करतांना व उचल केल्यानंतर कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी उचल करणाऱ्या निविदाधारकाची राहील.

११. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिलानुसार **दि. २०.०२.२०२५** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

१२. कोटेशन तपशिलासंबंधी अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला कार्यालयाशी संपर्क साधावा.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला

# <u>निविदा/कोटेशन मसुदा</u>

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत विविध विभागावरील जुने वापरात नसलेले ठिबक सिंचनाचे नळ्या विक्रीकरिताचे दर खालील प्रमाणे आहेत

| अ. क्र. | तपशील | दर (रु) |
|---|---|---|
| १ | जुने वापरात नसलेले ठिबक सिंचनाचे नळ्या | प्रति किलो |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता